# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक २९.०७.२०२६ बुधवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २८.०७.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत जुगार कायदा अन्वये ०२ केसमध्ये १२ इसमांवर कारवाई करुन ५३,५५०/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,०५४ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,५९,६००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक २८.०७.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २९.०७.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये एकुण ०६ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस.**

दिनांक २५.०७.२०२६ चे १४.३० वा. ते १५.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी सौरभ गोपाल शर्मा, वय २९ वर्षे रा. प्लॉट नं. ७७, नेताजी नगर, पाण्याचे टाकी जवळ, कळमना, नागपुर यांनी त्यांची होन्डा ॲक्टीवा मोपेड क्र. एम.एच. ४९ बि.ए. ८०२१ किंमती ५०,०००/—रू. ची त्यांचे राहते घरासमोरील शर्मा ट्रेडींग समोर लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद मोपेड चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे समांतर तपासात गुन्हेशाखा युनिट क्र. ५ चे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना एका ॲक्टीवा मोपेड वरील एक इसम संशयीतरित्या दिसून आल्याने, त्यास थांबवून त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव हर्षल मुकेश तभाने, वय १९ वर्षे, रा. हुडको कॉलोनी, जरीपटका, नागपुर असे सांगितले. त्यास वाहनाबाबत विचारणा केली असता, त्याने उडवा—उडवीचे उत्तरे दिल्याने, त्याला ताब्यात घेऊन पथक कार्यालयात आणून, वाहनाबाबत पडताळणी केली असता, नमुद वाहन हे पोलीस ठाणे कळमना येथील दाखल वाहनचोरीच्या गुन्हयातील असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचे ताब्यातुन चोरी केलेले मोपेड किंमती अंदाजे ५०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईकामी कळमना पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. विनायक गोल्हे तसेच, त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**<u>३) गुन्हेशाखा पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास अटक.</u>**

दिनांक २९.०७.२०२६ चे ०२.४५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. ६, ३ तसेच घरफोडी विरोधी पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीत पाहिजे आरोपी व गुन्हेगारांचे शोधार्थ पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना वार्ड नं. २, चिचोली हनुमान मंदीर जवळ राहणारा हद्दपार इसम नामे सुरज कन्हैय्यालाल कावडे, वय २६ वर्षे, हा राहते घरी मिळुन आला. आरोपीस युनिट कार्यालय येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०६ यांचे हद्दपार आदेश क्र. १०/२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०६ महीन्याकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले.

आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे खापरखेडा येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीस पुढील कार्यवाहीस्तव खापरखेडा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हेशाखा पोलीसांनी संयुक्तीकरित्या केली.



**<u>४) गुन्हेशाखा युनिट क्र. ३ पोलीसांची कामगिरी :—शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक २८.०७.२०२६ चे २०.३० वा. ते २१.३० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ३, पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत पेट्रोलींग करीत असता, गंगा जमुना रोड, राधाकृष्ण जनरल स्टोअर्स समोर, ओट्याजवळ एक ईसम संशयीतरित्या बसुन दिसल्याने, त्यास हटकले असता, तो पळु लागल्याने त्याचा पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव शाकीब शेख अब्दुल कलाम, वय २६ वर्षे, रा. हिवरी नगर, जयभिम चौक, आरीफ किराणा स्टोअर्स जवळ, नंदनवन, नागपुर असे सांगीतले. पेचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कमरेत पॅन्टचे आंत एक लोखंडी हत्तीमार चाकु

किंमती अंदाजे ५००/— रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने, जप्त करण्यात आला. आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्रे बाळगुन मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे लकडगंज येथे आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईकामी लकडगंज पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. अतुल मोहनकर, सफौ. ईश्वर खोरडे, पोहवा. विजय श्रीवास, अजय पाटील, पोअं. दिपक लाखडे व प्रमोद देशभ्रतार यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे एमआयडीसी :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २८.०७.२०२६ चे ११.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत, संकेत बार समोर, झेंडा चौक, हिंगणा, नागपुर येथुन एक अनोळखी पुरूष ईसम वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे वयाचे, जात असताना ट्रक क्र. एम.एच. ३६ एफ. २४०० चे चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन अनोळखी ईसमाचे अंगावरून नेवुन, त्यांचे जागीच मृत्युस कारणीभुत झाला.

याप्रकरणी फिर्यादी पोअं. अश्वीन मिश्रा यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी. येथे मपोउपनि. मनिषा जाधव ७०५७४८४५९१ यांनी आरोपी ट्रक चालकाविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं., सहकलम १७७, १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे हुडकेश्वर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २७.०७.२०२६ चे १२.०० वा. ते १८.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत ओम साई अपार्टमेंट, फ्लॅट नं. २०१, अन्नपुर्णा नगर, जुने पोलीस ठाणे रोड, हुडकेश्वर, नागपूर येथे राहणारे फिर्यादी गौरव दिवाकर भुजाडे, वय २९ वर्ष हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह कळमेश्वर येथे शेतीचे कामाने गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख ६०,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ३,४९,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे मपोउपनि. आरती कारंडे ७०३०६६२१८८ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे नंदनवन :—** सौ. प्रियंका रवि निंबुरकर, वय २८ वर्षे सोबत रियांश रवि निंबुरकर, वय ८ वर्ष दोन्ही रा. शिव मंदीर जवळ, शास्त्री नगर, नंदनवन, नागपूर हया दिनांक २३.०७.२०२६ चे ०९.०० वा. पासुन पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन प्रियंका** रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, केस—काळे लांब, अंगात— सलवार सुट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. ओळखचिन्हे— डावे हातावर प्रियंका नांव गोंदलेले आहे. **वर्णन रियांश** रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा—मध्यम, केस—काळे, अंगात— शर्ट व हाफ पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतो.

**२) पोलीस ठाणे कळमना :–** कार्तीक फकीरा मेश्राम, वय ६५ वर्षे, रा. म्हाडा क्वॉर्टर, मिनीमाता नगर, कळमना, नागपूर हे दिनांक २४.०६.२०२६ रोजीपासुन पोलीस ठाणे कळमना हद्दीतुन, कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग–सावळा, चेहरा–लांबट, बांधा–मध्यम, केस–काळे, अंगात– आकाशी रंगाचा शर्ट व पांढऱ्या रंगाचा पॅन्ट घातलेला आहे. भाषा–मराठी/हिंदी बोलतात.

**३) पोलीस ठाणे हुडकेश्वर :–** अब्दुल रफीक शेख, वय ४० वर्षे, रा. प्लॉट नं. १०४, दिप नगर, शितला माता मंदीर मागे, हुडकेश्वर, नागपूर हे दिनांक २१.०७.२०२६ चे २०.०० वा. पासुन पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतुन, कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग–गोरा, चेहरा–लांबट, उंची–५ फुट ९ इंच, बांधा–सडपातळ, केस–काळे, अंगात– आकाशी रंगाचा शर्ट व पॅन्ट घातलेला आहे. भाषा–हिंदी बोलतात.

**४) पोलीस ठाणे जरीपटका :–** अशोक विरानी, वय ५२ वर्षे, रा. प्लॉट नं. ४४८, राधास्वामी डेरा, सत्संग हॉल जवळ, जरीपटका, नागपूर हे दिनांक २३.०७.२०२६ चे ११.३० वा. पासुन पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतुन, कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग–गोरा, चेहरा–गोल, उंची–५ फुट २ इंच, बांधा–मध्यम, केस–काळे पांढरे, अंगात– निळ्या रंगाची टि–शर्ट व निळ्या रंगाचा बरमुडा घातलेला आहे. भाषा–सिंधी/हिंदी बोलतात. ओळख– डाव्या हातावर दिनेश व उजव्या हातावर ओम गोंदलेले आहे.

**५) पोलीस ठाणे कोराडी :–** फईम शेख मुकीम शेख, वय ३८ वर्षे, रा. प्रिती सोसायटी, फ्लॅट नं. ७५, ओम नगर, नारा, कोराडी, नागपूर हे दिनांक २५.०७.२०२६ चे १६.०० वा. पासुन पोलीस ठाणे कोराडी हद्दीतुन, कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग–गोरा, चेहरा–गोल, उंची–६ फुट, बांधा–मजबुत, केस–डोक्याचे मध्ये टक्कल पडलेले असुन काळे पांढरे, अंगात– काळ्या रंगाची टि–शर्ट व निळ्या रंगाचा जिन्स घातलेला आहे. भाषा–हिंदी बोलतात.


सौ. प्रियंका


रियांश


कार्तीक


अब्दुल रफीक


अशोक


फईम शेख

**स्वा/–**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

# वाहतुक शाखेची प्रेसनोट

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत वाहतूक विभाग परिमंडळामध्ये बऱ्याच कालावधीपासून जमा असलेले विनादाव्याचे (Unclaimed Vehicles) वाहनांची स्क्रॅप म्हणुन विल्हेवाट करण्याकरीता, वाहतूक परिमंडळ लकडगंज येथे जमा असलेले एकुण ११३ दुचाकी वाहनांची बंद निवीदेव्दारे विक्री करण्यात आली आहे.

नागपूर शहर पोलीस आयुक्तालयातील वाहतुक परिमंडळ लकडगंज अंतर्गत जमा असलेले विनादाव्याचे (Unclaimed Vehicles) वाहनांचा दिनांक २८.०७.२०२६ रोजी पोलीस उप–आयुक्त वाहतूक कार्यालय येथे दुपारी १३.०० वा. स्क्रॅप खरेदी विक्री करणारे विक्रेत्यांनी सादर केलेल्या एकुण १६ निवादाचे बंद लिफाफे त्यांचे समोर उघडण्यात आले. यापैकी श्री. रियाज अहमद खान, बुशरा ऑटो स्पेअर पार्ट, नागपुर यांनी सर्वात जास्त रकमेचा दर प्रति नग ५३००/–रू. प्रमाणे ५,९८,९००/–रू. जाहीर झाल्याने, त्यांना संपुर्ण ११३ वाहने स्क्रॅप म्हणुन विक्री करण्यात आलेली आहे.

**स्वा/–**

( आदित्य मिरखेलकर, भापोसे. )
पोलीस उप आयुक्त वाहतुक,
नागपुर शहर.